**<u>नियमित दिवाणी दावा क्र.१५६/२०२२ मधील नि.क्र.११ वरील आदेश</u>**

श्री. मारूती पांडुरंग कुंदेकर
**वि.**
श्री. शंकर पांडुरंग कुंदेकर, वगैरे.

वादी यांनी प्रस्तुत दावा प्रतिवादी विरूद्ध वाटप व पृथ्थक कब्जा होऊन मिळणेकरीता दाखल केला आहे. प्रतिवादी यांनी नि.क्र.११ वरील अर्जाद्वारे त्यांच्याविरुध्द नियमानुसार आपोआप पारीत झालेला 'विना बचावपत्र' चा आदेश रद्द करुन त्यांनी अर्जासोबत दाखल केलेले बचावपत्र अभिलेखावर घेण्यासाठी विनंती केली आहे. अर्जात प्रतिवादी कथन करतात की, दाव्याची कागदपत्रे महसुल विभागाकडून त्यांना वेळेत उपलब्ध झाली नसल्याने त्यांना विधिज्ञांना भेटून मुदतीत कैफियत दाखल करता आली नाही. सदर प्रतिवादी यांना कैफियत दाखल करण्यास झालेला विलंब माफ झाला नाही तर त्यास त्याच्या कायदेशीर हक्कापासून वंचित राहावे लागणार असून त्याचे आतोनात असे नुकसान होणार असून त्यांना न्यायापासून वंचित राहावे लागणार आहे. म्हणून त्यांनी त्यांचे विरूद्ध पारीत झालेला विना बचावपत्राचा आदेश रद्द करून त्यांचा सदरचा अर्ज मंजुर करावा अशी विनंती केली आहे. अर्जासोबत प्रतिवादी क्र.१ यांनी शपथपत्र सादर केले आहे.

२. याउलट, वादीने अर्जाचे तळाशी त्यांचे म्हणणे दाखल करुन अर्ज कायद्यानुसार चालण्यास पात्र नसुन अर्जातील विलंबाचे कारणे बरोबर नसल्याचे कथन केले आहे. जर अर्ज मंजुर करावयाचा झाल्यास जास्तीत जास्त कॉस्टवर मंजुर करावा अशी विनंती केली आहे.

३. वादीने सदरचा दावा वाटप व कब्जा मिळणेकरीता दाखल केलेला आहे. नैसर्गिक न्याय तत्वानुसार, बचावाची संधी ही या तत्वाचा मूल आधार आहे. त्यामुळे बचावाची संधी नाकारणे सुध्दा न्यायसंगत होणार नाही. मा.सर्वोच्च न्यायालयाचे '***<u>संदिप थापर वि. एस.एम.इ. टेक्नॉलॉजीस, एआयआर २०१४ सर्वोच्च न्यायालय ८९७</u>***' मधील न्यायनिर्णयात उध्दृत केल्यानुसार बचावपत्र दाखल करण्यास केवळ ३० दिवसांचा अवधी कायदयाने मान्य आहे व त्यापुढील ६० दिवसाचा वाढीव अवधी हा केवळ अपवादात्मक परिस्थितीमध्ये मान्य करता येईल. या वाढीव अवधीचा उद्देश हा एखादया पक्षावर होणारा अन्याय होऊ न देणे हाच आहे. तथापि, सहजपणे अशा प्रकारचा अर्ज व अशा प्रकारची विनंती मान्य करता येणार नाही हा सुध्दा प्रस्थापित

विधिसिध्दांत आहे. प्रकरणाचे अभिलेख पाहता, प्रतिवादी यांना या प्रकरणातील दावा आदेशिका दि.११/११/२०२२ रोजी प्राप्त झाल्यानंतर वस्तुतः, त्यांनी मुदतीत त्यांचे बचावपत्र दाखल करणे आवश्यक होते. प्रतिवादी यांनी प्रस्तुतचा अर्ज हा दि.२०/०२/२०२३ रोजी दाखल केला आहे. यावरून प्रतिवादींना बचावपत्र दाखल करण्यास ९ दिवसाचा विलंब झाल्याचे स्पष्टपणे दिसत आहे. तथापि, बचावाची संधी ही नैसर्गिक न्यायतत्वाचा महत्वाचा भाग आहे. अर्जदार प्रतिवादी यांनी अर्जात नमुद केलेल्या कारणांचा विचार करून झालेल्या विलंबाबाबत व त्यामुळे झालेल्या प्रतिपक्षाच्या नुकसानीबाबत सुध्दा विचार होणे न्यायाचे संतुलन राखण्यासाठी आवश्यक बनते. या सर्व बाबींचा साकल्ल्याने विचार करुन अर्जदार प्रतिवादी विरुध्द खर्चाच्या रकमेचा आदेश करुन त्यांचे बचावपत्र अभिलेखावर घेण्यासाठी पात्र आहे. सबब, पुढील आदेश.

**आ दे श**

प्रतिवादी यांचा नि.क्र.११ वरील अर्ज रक्कम रू.२००/– वादीस देण्याच्या अटीवर मंजुर करण्यात येतो.

प्रतिवादी यांनी नि.क्र.१२ वर दाखल केलेले बचावपत्र अभिलेखावर पुढील शर्ती व अटींना अधीन राहून नोंदविण्यात येत आहे.

प्रतिवादी यांच्याविरुध्द नियमानुसार आपोआप पारीत झालेला 'विना बचावपत्र' चा आदेश त्यांनी पुढील पुर्तता केल्यानंतर रद्द ठरेल.

प्रतिवादी यांनी खर्चाच्या रकमेची पुर्तता पुढील तारखेपर्यंत न केल्यास सदर आदेशाचा अंमल संपुष्टात येईल याची अर्जदार प्रतिवादी यांनी व वादीने नोंद घ्यावी.

DISTRICT COURT, MAHARASHTRA
सत्यमेव जयते
Digitally signed by SHIPKULE CHARUDATTA
Date: 2024.05.04 15:05:50 +0530

**दि. ०४/०५/२०२४.** **(चारूदत्त उद्धव शिपकुले)**
**चंदगड** **दिवाणी न्यायाधिश, क. स्तर, चंदगड**